महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१, दूरध्वनी २२६२०२३१/२

क्रमांक:-डिओअे-२०२१/दोन/142 दिनांक: 20 JAN 2021

प्रति,
अधिष्ठाता व प्राचार्य,
शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित
व विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्था, (महाराष्ट्र राज्य)

विषय:- शैक्षणिक सत्र २०२०-२०२१ (पदविका /प्रमाणपत्र अभ्यासक्रम)
प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेबाबत..

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्थांसाठी पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया केंद्रीभूत पध्दतीने, ऑनलाईन स्वरुपात घेण्यात आली आहे. तसेच संचालनालयाचे प्रसिध्दीपत्रक दि.०९.१२.२०२० अन्वये कळविल्यानुसार ज्या महाविद्यालयामध्ये जागा रिक्त आहेत अशा महाविद्यालयांनी दि.२८.१२.२०२० स्पॉट ॲडमिशन करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तद्नंतरही पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत विद्यार्थी व पालकांकडून मागणी होत असल्याने काही महाविद्यालयात पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश रिक्त असल्याने तसेच विद्यार्थी कला शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी रिक्त जागेवर प्रवेश घेण्याकरिता स्पॉट ॲडमिशनची **अंतिम दिनांक ३१.०१.२०२१** करण्यात येत आहे. सदर प्रवेश शासनाच्या प्रचलित नियमांनुसार गुणवत्तेनुसार देण्यात यावेत.

दिनांक ३१.०१.२०२१ नंतर कला महाविद्यालयांनी प्रवेश देऊ नयेत. तद्नंतर देण्यात येणारे प्रवेश ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच कला महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रांची पडताळणी फेब्रुवारी, २०२१ अखेर पर्यंत निरीक्षक, चित्रकला, शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्य यांची राहील. ज्या महाविद्यालयांची प्रवेश पडताळणी निरीक्षक कार्यालयाकडून करुन घेण्यात येणार नाही, अशा महाविद्यायातील प्रवेश निश्चित नाही, असे समजून सदर महाविद्यालयातील विद्यार्थी परीक्षेस पात्र होणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

जानेवारी, २०२१ अखेर पर्यंत प्रवेश होणाऱ्या विद्यार्थ्यांचे वर्गकाम व तद्नुषंगिक बाबी पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य यांची राहील.

(राजीव मिश्रा)
कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

प्रत,माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१)निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२)परीक्षा नियंत्रक,कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
३)सहायक निरीक्षक,चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय,नागपूर.
४)सहायक निरीक्षक,चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय,औरंगाबाद.
५)कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक:-तीन/पाच यांना माहितीसाठी अग्रेषित.

SMP/SATRARAMBHA SATRASAMAPTI

Scanned by TapScanner